**प्रेसनोट दिनांकः-२८/०५/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीसांकडुन प्रेमविवाह केलेल्या नव दाम्पत्यांच्या दोन कुटूंबियांचे मनोमिलन**

यातील एक पुरूष,वय-२२ वर्षे, रा.बुधवार पेठ,पुणे याचे एक सज्ञान मुलगी,वय-२१ वर्षे हिचेशी सुमारे चार वर्षापासुन असलेल्या प्रेम संबंधातुन एकमेकांनी विवाह करण्याचे हरविले. परंतु सदर प्रेम विवाहास मुलीचे कुटूंबियांचा विरोध होता. परंतु सदर विरोध डावलुन दोघांनी दिनांक-२३/०५/२०१९ रोजी आळंदी,पुणे येथे विवाह केला. या कारणावरुन मुलीचे कुटुंबीय मुलावर रोष ठेवुन होते. तसेच त्यास वारंवार फोनवरुन रागावुन बोलत होते. त्यामुळे दोघांचे कुटुंबीय मानसिक दडपणाखाली वावरत असल्याने त्यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात येवुन वरील हकिगत पोलीसां जवळ कथन करुन केली.

सदरवेळी विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सुनिल कलगुटकर यांनी व त्यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाण्याचे कम्युनिटी पोलीसिंग ऑफिसर सच्चिदानंद शंकर कुळकर्णी, सहाय्यक पोलीस उप-निरीक्षक यांनी वर नमुद नवदाम्पत्य व त्यांचे कुटूंबियांशी सुसंवाद साधुन,त्यांचे समुपदेशन करुन,त्यांचे मनावरील दडपण दुर करून,पुढे भविष्यांत काही अडचण आल्यास त्यांना पोलीस ठाण्याचा व आपला वैयक्तिक संपर्क क्रमांक देवुन पुढील कार्यवाहीबाबत समजावुन सांगितले. तसेच पोलीसांनी केलेल्या समुपदेशनानुसार केलेल्या कार्यवाहीमुळे मुलीचे कुटूंबियांचा मुलावर असलेला रोष कमी झाल्याचे मुलाने सांगितले. सदर बाबत मुलगा व त्याचे कुटूंबियांनी पोलीसांनी केलेल्या मदती बद्दल पोलीसांचे आभार मानले.

( एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.